MHAU120007332025

कि.फौ.अर्ज क्र.–५८/२०२५
आशाबाई व इतर वि. भिकन व इतर

## नि. क्र.–०३ वर आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने अंतरीम पोटगी मिळणेकरीता दाखल केला आहे. तिने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदाराचे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत सन २०१३ मध्ये मौजे सांगवी, ता. जमानेर, जि. जळगाव येथे झाले आहे व त्यांचे विवाह नाते कायम आहे व सदर विवाह संबंधातुन अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांना तिन मुले नामे रमजान, रहीम व अलीम अशी आहेत व अर्जदार क्र.२ ते ४ हे अर्जदार क्र.१ कडेच आहेत.

**०२.** पुढे अर्जदाराने असे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडे नांदण्यास गेली, सर्व गैरअर्जदार हे एकत्र राहण्यास होते. गैरअर्जदार यांनी सुरुवातीचे दोन ते तिन महिनेच सुखाने नांदविले व त्यानंतर अर्जदार क्र.१ हिस काहीएक कारण नसतांना अश्लील शिवीगाळ करुन, मारहाण करुन, तिस शारिरीक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली व तसेच तिने माहेरुन पैसे आणण्याची मागणी केली. तसेच अर्जदार क्र.१ हिस गैरअर्जदार हे लग्नात मानपान केला नाही व तसेच हुंडा दिला नाही म्हणून शारीरिक व मानसिक त्रास देत असत. अर्जदार क्र.१ हिने गैरअर्जदारांना समजावून सांगितले परंतु त्यांनी काहीएक ऐकून घेतले नाही. तसेच दि.१४.१०.२०२४ रोजी दारुचे नशेत गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस पैशाच्या कारणावरुन मारहाण केली. सदर पैशांच्या कारणावरुन एक वर्षापुर्वी गैरअर्जदारांनी अर्जदारास तिन्ही मुलांसह घराच्या बाहेर काढून दिले.

**०३.** पुढे तिने असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ हिने गैरअर्जदारांना नांदायला न्यावे म्हणुन ब–याचवेळा विनंती केली, परंतु गैरअर्जदार हे पैशाच्या मागणीवर ठाम राहिले व अर्जदार क्र.१ हिस नांदायला आजपावेतो नांदायला घेऊन गेले नाही. तसेच गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ व ४ यांच्या अन्न, वस्त्र व निवारा तसेच मुलभूत गरजा व औषधापचार याबाबत कुठलीही व्यवस्था केलेली नाही. अर्जदार क्र.१ ची माहेरी परिस्थिती हलाखीची असल्याने तिच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. याउलट गैरअर्जदार यांची ५ एकर शेतजमिन आहे व त्यापासून तो १० लाख रुपये उत्पन्न कमवितो. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ४ यांना प्रत्येकी ३,०००/– खावटी म्हणुन अर्जदारास देवु शकतो. त्यामुळे तिने तिचा अर्ज मंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

**०४.** गैरअर्जदार हा प्रकरणात हजर झाला. परंतु त्याने त्याचे म्हणणे दाखल न केल्यामुळे सदर प्रकरण विना जवाब चालविण्याचा आदेश दि.०१.१२.२०२५ रोजी पारित करण्यात आला आहे.

**०५.** दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदर अर्ज निकाली काढणेकरीता खालील मुद्दे निघतात, त्यांची कारणेमिमांसा व निष्कर्ष पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार क्र.१ ते ४ हे गैरअर्जदार याच्याकडुन अंतरिम खावटी मिळणेकरीता पात्र आहे ? | **...अंशतः होय.** |
| **२.** | आदेश काय ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणेमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्र. १ व २ करीता</u> –**

**०६.** अर्जदाराने मुख्यतः गैरअर्जदार व त्याचे कुटुंबियांवर शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप केला आहे. त्याचप्रमाणे तिने इतरही आरोप गैरअर्जदार क्र.१ वर केलेले आहेत. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ४ हे मुले असुन, ते सध्या स्थितीत ती अर्जदाराच्या माहेरी राहत आहे. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये वाद विवाद आहेत, ही बाब स्पष्ट होते. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा खरोखरच शारीरिक व मानसिक छळ केला किंवा नाही, ही बाब पुराव्यानंतरच स्पष्ट होईल. परंतु सध्या स्थितीत अर्जदार व गैरअर्जदार यांचे ताणलेले संबंध बघता, अर्जदार ही अंतरिम खावटी मिळण्यास पात्र आहे.

**०७.** अर्जदार क्र.१ ही माहेरी राहत असल्यापासुन सामनेवाला याने तिचा व अर्जदार क्र.२ ते ४ यांच्या उदरनिर्वाह होण्यासाठी कोणतीही मदत केल्याचे पटलावर नाही. वास्तविकरित्या पती म्हणुन पत्नीला व मुलांना आर्थिक सहाय्य देण्याची जबाबदारी पतीवरच आहे. प्रकरणातील अजुन एक महत्वाची बाब अशी की, अर्जदार ही मुलांसह माहेरी राहत असल्यापासून गैरअर्जदार याने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची कोणती सोय केली, याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा पटलावर दाखल केला नाही. तसेच अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्या उत्पन्नाबाबत त्यांचे नावे असलेल्या गट क्र.८६/२अ, याच्या सातबारा उता–याची प्रमाणित प्रत पटलावर दाखल केली आहे. सदर सातबारा उता–याचे अवलोकन केले असता, असे निर्दशनास येते की, गट क्र.८६/२ अ, वरील शेती ही फकीरा रमजान तडवी याचे नावावर असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. परंतु फकीरा हा सदर अर्जामध्ये गैरअर्जदार म्हणुन सामील नाही. त्यामुळे सदर शेतजमिनीपासून गैरअर्जदार क्र.१ याला उत्पन्न मिळते, ही बाब

प्रथमदर्शनी दिसून येत नाही. जरी गैरअर्जदार क्र.१ याचे उत्पन्नाबाबत निश्चीत असा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नसला तरी तो शरीराने धडधाकड नाही, अशी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही. त्यामुळे तो कामधंदा करुन, अर्जदार क्र.१ हिचा पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचा पिता या नात्याने पालनपोषण करु शकतो व ती सर्वस्वी जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची आहे. एवढेच नाहीतर अर्जदार क्र.२ ते ४ हे अर्जदार क्र.१ हिच्याकडे राहतात. अर्जदार क्र.२ ते ४ हे गैरअर्जदार क्र.१ याचे मुले असल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाची काळजी घेतली नाही, असे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे मी मुद्दे क्र.१ करीता खालील आदेश पारित करीत आहे.,

**<u>आदेश</u>**

**१.** अर्जदाराचा अंतरिम खावटीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

**२.** गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ ते ४ यांना प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये १,०००/– अंतरिम खावटी म्हणुन पुढील आदेश होई पावेतो द्यावी.

**३.** आदेशाची प्रत अर्जदाराला विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.02.03 12:16:32 +0530

**<u>दिनांक</u> – ०३.०२.२०२६**

[एम. बी. पाटील]
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
सोयगांव.